● मंगळवार, दि. २२ ऑक्टोबर २०२४ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ९० वा ● किमंत २ रुपये ● पाने ४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## हिंदूत्वनिष्ठ पांगारकरांचा नव्हे हा भगव्याच्या शिलेदारांचा अवमान - हिंदू महासभा

### श्रीकांत पांगारकर यांना हिंदु महासभेच्यावतीने जालना विधानसभा लढविण्याची ऑफर

**जालना । प्रतिनिधी -** श्रीकांत पांगारकर यांना शिवसेना (शिंदे गटात) जालना विधानसभा प्रमुखपदी नियुक्ती केल्यानंतर दोनच दिवसांनी त्यांच्या पदावर एकनाथ शिंदे यांच्या आदेशाने स्थगिती देण्यात आली. हा प्रकार म्हणजे हिंदूत्वनिष्ठ श्रीकांत पांगारकर यांच्यासह समस्त हिंदूत्ववादी कार्यकर्त्यांचा अवमान होय असे अखिल भारत हिंदू महासभेचे प्रदेश संघटनमंत्री तथा सकल हिंदू समाजाचे समन्वयक धनसिंह सुर्यवंशी यांनी युवा आदर्शशी बोलतांना सांगितले. हा प्रकार शिवसेनेला (शिंदे गट) शोभणारा नसून याचा परिणाम येणाऱ्या निवडणुकीत हिंदुत्त्वाच्या नावाने जोगवा मागणाऱ्या सर्वच राजकीय पक्षांना भोगावा लागणार असल्याचेही श्री सुर्यवंशी यांनी स्पष्ट केले.

माजी नगरसेवक असलेले श्रीकांत पांगारकर यांना कर्नाटक उच्च न्यायालयाने ४ सप्टेंबर २४ रोजी जामीन मंजुर केला असून सध्या ते जामीनावर आहेत. शुक्रवारी शिंदेच्या शिवसेनेत त्यांना जालना विधानसभा प्रमुख पदी माजी मंत्री तथा शिवसेनेचे नेते अर्जुनराव खोतकर यांनी एका कार्यक्रमा नियुक्ती केली होती. त्यांनतर दोनच दिवसांनी रविवारी एकनाथ शिंदे यांच्या आदेशाने सचिव भाऊसाहेब चौधरी यांनी या नियुक्तीला स्थगिती दिली होती. ही स्थगिती म्हणजे समस्त हिंदु समाजाचा अवमान असल्याची प्रतिक्रिया धनसिंह सुर्यवंशी यांनी दिली आहे. हा हिंदुत्ववादी श्रीकांत पांगारकर व सर्व समाजाचा अवमान आहे. हा प्रकार शिवसेनेला शोभणीय नाही. असेही श्री सुर्यवंशी म्हणाले. माजी नगरसेवक तसेच हिंदुत्त्ववादी श्रीकांत पांगारकर यांनी हिंदु महासभेच्यावतीने जालना विधानसभा निवडणुक लढवावी अशी ऑफर श्री. पांगारकर यांना श्री सुर्यवंशी यांनी दिली आहे.

प्रख्यात पत्रकार गौरी लंकेश यांची पाच सप्टेंबर २०१७ रोजी बेंगळूरू येथे गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती. या हत्ये प्रकरणात तसेच नालासोपारा येथील शस्त्रसाठा प्रकरणात श्रीकांत पांगारकर व अन्य काहींना एटीएसने २०१८ मध्ये श्रीकांत पांगारकर यांना अटक करण्यात आली होती.



पांगारकर हे सध्या जामीनावर बाहेर आहेत.

श्रीकांत पांगारकर हे २००१ पासून शिवसेनेशी संबंधीत होते. पांगारकर हे शिवसेना पक्षाकडून दोन वेळा नगरसेवक राहिले आहेत. नंतर पक्षाने २०११ मध्ये त्यांना तिकीट नाकारले होते. शिवसेनेत माजी नगरसेवक श्रीकांत पांगारकर यांचे मोठे कार्य आहे.

## टेंभुर्णीसह परिसराला अवकाळी पावसाने झोडपले

### खरीपसह रब्बीच्या पीकांना फटका

**दत्ता देशमुख**

**जाफराबाद -** तालुक्यातील टेंभुर्णीसह परिसरात मागील पंधरा दिवसांपूर्वी झालेल्या अतिवृष्टीनंतर पुन्हा शनिवारी रात्री धो-धो पाऊस बरसला. यामुळे खरीप हंगामाचे मोठे नुकसान झाले आहे. रब्बी हंगामातील उगवून आलेल्या कोवळ्या शाळू ज्वारीलाही मोठा फटका बसला आहे. दरम्यान, अतिवृष्टीच्या या नैसर्गिक संकटामुळे बळीराजा भांबावून गेला असून, नुकसानीचे पंचनामे करण्याची मागणी शेतकरी करीत आहेत.



टेंभुर्णीसह परिसरात वेळोवेळी होणाऱ्या अतिवृष्टीमुळे पीकांना मोठा फटका बसला होता. त्यानंतर आता पुन्हा झालेल्या जोरदार पावसामुळे वेचणीला आलेल्या कपाशीच्या वाती झाल्या आहेत. परिसरातील अनेक ठिकाणी कपाशीवर लाल्याचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. त्यामुळे एका वेचणीतच कपाशीचा खराटा होत आहे. खरीप हंगामावर मोठा खर्च करूनही पाहिजे तसे उत्पादन मिळत नसल्याने आता पेरणीचा खर्चही निघतो की नाही याची चिंता बळीराजाला लागली आहे. ऐन दिवाळीच्या तोंडावर शेतकऱ्यांवर हे नैसर्गिक संकट ओडावल्याने शेतकऱ्यांची दिवाळी काळोखात जाणार असल्याची चिन्हे दिसू लागली आहे.

शेतातून कापूस भिजल्यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. यासोबतच रब्बी हंगामातील नव्याने उगवून आलेल्या शाळू ज्वारीचे कोवळे पीक पाण्यात डुबल्याने त्याचेही मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे शासनाने पंचनामे करून आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी शेतकरी करीत आहेत.

## पोलीसांनी घातपाताचा डाव उधळून लावला

**गडचिरोली -** विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नक्षल्यांचा घातपाताचा डाव उधळून लावण्यात गडचिरोली पोलिसांना २१ ऑक्टोबरला यश आले. छत्तीसगड सीमेवरील कोपर्शी जंगलात नक्षलवादी व जवानांत झालेल्या जोरदार चकमकीत पाच नक्षल्यांना पोलिसांनी कंठस्नान घातले. चकमकीत एक जवान जखमी झाला असून त्याच्यावर उपचार सुरु आहेत.

## परशुराम आर्थिक महामंडळ; राज्यातील संघर्ष योद्ध्यांचा सत्कार

### स्व. विलास नाईक प्रतिष्ठानचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** ब्राह्मण समाजातील होतकरू आणि गरजू युबक, युवतीना आपला छोटा मोठा व्यवसाय उद्योग उभारणीसाठी राज्य सरकारने परशुराम आर्थिक विकास महामंडळाची स्थापना करून प्राथमिक तरतूद म्हणून ५० कोटी रूपयांचा निधी दिला आहे. भविष्यात हा निधी एक हजारकोटींवर नेण्यासाठी आपण सरकारकडे पाठपुरावा करू असे आश्वासन जवळपास सर्वच राजकीय पक्षांच्या नेत्यांनी दिले.

स्व. विलास नाईक प्रतिष्ठानच्या वतीने रविवार (दि २०) रोजी स्वयंवर मंगल कार्यालयात भगवान परशुराम आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्यासाठी समाजातील ज्यांनी ज्यांनी पाठपुरावा आणि उपोषण केली त्या सर्व संघर्ष योद्धांचा सत्कार आयोजित करण्यात आला होता. या सोहळव्यासाठी भास्कर महाराज देशपाड़े (नबनाथ संस्थान, जाफराबाद), ह.भ.प.विश्वास महाराज गोंदीकर (प्रसिद्ध भागवतकार,जालना), ह.भ.प. रामदास महाराज आचार्य (श्रीराम मंदिर संस्थान, जालना) यांची प्रमुख उपस्थिती होती.



या प्रसंगी परशुराम आर्थिक महामंडळ मिळावे म्हणून मराठवाड्यातील संघर्ष योध्ये म्हणून पद्देवा जोशी - पालमकर (पालम, परभर्णी), अविनाश जोशी (पालम,परभणी), बाजीराव धर्माधिकारी (परळी, बीड), विश्वजीत देशपाडे(पुणे), सचिन वाढे पाटील ( छत्रपती संभाजीनगर) केदार पाटील(छत्रपती संभाजीनगर), प्रसाद खारकर (सेलू, परभणी), निखिललातूरकर (नांदेड), अनिल मुळे (छत्रपत्ती संभाजीनगर), सुरेश देशपांडे(छत्रपती संभाजीनगर), आर. बी. शर्मा (छत्रपती संभाजीनगर),विलास अकोलकर (छत्रपती संभाजीनगर), उमेश जोशी (परभरणी),सुरेश मुळे (जालना), विजया कुलकर्णी (छत्रपती संभाजीनगर),विजया अवस्थी (छत्रपती संभाजीनगर), शाम कुलकर्णी (गंगाखेड,परभणी), प्रकाश केदारे (पाथरी, परभणी), डॉ. संजय सुपेकर(गंगाखेड, परभणी), शैलेश कुलकर्णी (अंबेजोगाई, बीड), वसंत किनगावकर (छत्रपती संभाजीनगर), लक्ष्मीकांत दडके (पाथरी,परभणी), संतोष कुलकर्णी (परभणी), ॲड. प्रसाद देशमुख (बीड),भानुदास शौचे (नाशिक), रामनिवास गौड यांचा गौरव करण्यात आला.

याप्रसंगी स्व.विलास नाईक प्रतिष्ठानच्या भारती नाईक व श्रेया नाईक यांचा सत्कार रसना देहेडकर व रमेश देहेडकर यांनी केला.

**महामंडळासाठी भविष्यात एक हजार कोटींची तरतूद करू - खोतकर**

जालन्यातून भगवान परशुराम आर्थिक विकास महामंडळ स्थापनकरण्यासाठी सर्वात अगोदर प्रयत्न झाले, त्यामुळे हा आपण हा मुद्दा विधानसभेत मांडला त्या वेळी महामंडळाचे बीज रोवले होते. आता त्याला मंजुरी मिळन अंकर फुटलेआहेत. भविष्यात या महामंडळासाठी भरीवी अशी तरतूद करून ती जवळपास एक हज़ारकोटीच्या आसपास नेऊ अशी ग्वाही माजीमंत्री अर्जुन खोतकर यांनी पान २ वर

युवा आदर्श

गालगुच्चा ...

कुणी कुणाची सुध्दा
घेतोयं भेट सदिच्छा
आंत हो लोकनाट्य
पुरवा आमची इच्छा
मला नको रे तिकीट
साळसूद बने लुच्चा
यंदा ताज्या दमाचा
इच्छुक माझा बच्चा
सोडणारं नाही पक्षा
कार्यकर्ता मी सच्चा
धूर्तपणात तो पक्का
चेला न गुरुचा कच्चा
साहेबांचा मुलगा श्रेष्ठ
अभ्यास जरी कच्चा
अभिनंदन करा मस्त
घेता गोड गालगुच्चा
हातात त्यांच्या झेंडा
आम्ही पकडी कच्छा
श्रेष्ठीची अंतिम इच्छा
जोभी होगा रे अच्छा
आम्ही तसेचं कोरडे
दुसऱ्या नावाने पर्च्या
आमचा होईलं खर्चा
वाटव्या त्यांना खुर्च्या

हेमंत मुसरीफ पुणे
9730306996.

विधानसभा निवडणुक २०२४

## चंदनझिरा पोलीसांचे पथसंचलन



**जालना । प्रतिनिधी -** आगामी विधानसभा निवडणूकीच्या अचारसंहीताच्या पार्श्वभूमीवर तसेच सण उत्सवादरम्यान शहरात अनुचित प्रकार घडू नये व कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी सोमवार (दि २१) रोजी सकाळी अकरा वाजेच्या दरम्यान चंदनझिरा पोलीस ठाणे हद्दीतील मुख्य मार्गावरून रॅपिड ॲक्शन फोर्स पोलीसांकडून रुट मार्च म्हणजेच पथसंचलन करण्यात आले.

या पथसंचलनाला चंदनझीरा पोलिस ठाण्यापासून सुरुवात झाली. त्यानंतर ठाणे हद्दीतील सुंदर नगर, एकता चौक, अशोक चौक, हनुमान मंदिर, महात्मा ज्योतीबा फुले चौक, मौलाना आझाद चौक असे मार्गक्रमण करुन चंदनझिरा चौक इंद्रायणी हॉटेल येथे समारोप करण्यात आला. या रूट मार्चमध्ये दंगा नियंत्रण पथक, एसआरपीएफचे जवान, चंदनझीरा पोलिस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सम्राटसिंग राजपूत, उपनिरिक्षक सचिन सानप यांच्यासह ठाण्याचे पोलीस अधिकारी कर्मचारी यांचा सहभाग होता.

## परजिल्ह्यातून खून करून पळुन आलेल्या आरोपीला जालना पोलीसांनी केले जेरबंद

### जालना स्थानिक गुन्हे शाखा व चंदनझिरा पोलिसांची संयुक्त कारवाई

**जालना । प्रतिनिधी -** परजिल्ह्यातून खून करून पळुन आलेल्या आरोपीला जालना पोलीसांनी जेरबंद केले आहे. ही कारवाई जालना स्थानिक गुन्हे शाखा व चंदनझिरा पोलीसांनी संयुक्तरित्या केली आहे.



याबाबत अधिक माहिती अशी की, २० ऑक्टोबर रोजी रात्री ०९:३० वाजेच्या सुमारास बहिणीस सासरवाडी येथे जबरदस्ती घेवुन का गेले याचा जाब विचारण्यास गेलेला भाऊ अमोल फुलचंद नागणे, वय-२६ वर्ष, रा. चंदनझिरा, जालना याने मेव्हण्याचा नातेवाईक शंकर गजु तटवारे, वय-३५ वर्ष, रा. डोंगरगावं, ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर यावर चाकुने वार करुन त्याचा खुन केला होता. त्यानुषंगाने सिल्लोड पोलीस ठाणे येथे आरोपी विरुध्द खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आलेला होता. आरोपी नामे अमोल फुलचंद नागणे, वय-२६ वर्ष, रा. चंदनझिरा, जालना हा जालना येथे पळुन आलेला असल्याबाबत गुप्तबातमीदारामार्फत माहिती मिळाल्यावरुन पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल यांचे सुचनेनुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव यांनी एक पथक तयार करुन आरोपीचा शोध घेणेबाबत सुचना दिल्या होत्या. सोमवार (दि २१) रोजी आरोपीचा शोध घेत असतांना आरोपी नामे अमोल फुलचंद नागणे हा जालना बस स्थानक परिसरामध्ये असल्याबाबत खात्रीलायक माहिती मिळाली त्यानंतर त्यास बस स्थानक परिसरातुन ताब्यात घेतले व त्यास पुढील कारवाईसाठी सिल्लोड पान २ वर

# संपादकीय

पान

## विषारी दारूचे बळी

बिहार मध्ये विषारी दारू पिऊन चाळीस पेक्षा अधिक लोकांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना नुकतीच घडली. विषारी दारू पिऊन मृत्युकांड घडल्याची ही देशातील पहिली वेळ नाही तर अशा अनेक घटना याआधी देशात घडल्या आहे. दरवर्षी अशी एखादी तरी घटना घडतेच. सहा महिन्यापूर्वीच तामिनाडूमध्ये अशी दुर्दैवी घटना घडली होती. मागील पूर्वी पंजाबमध्ये विषारी दारू पिऊन ९० लोकांचा बळी गेला होता. बिहार राज्यातील तर अशा अनेक घटना घडल्या आहेत. दोन वर्षापूर्वी बिहारमध्येच विषारी दारू पिऊन ३६ जणांना जीव गम वावा लागला होता. बिहार हे राज्य तर विषारी दारू साठीच प्रसिद्ध आहे की काय अशी शंका आता येऊ लागली आहे कारण विषारी दारूचे सर्वाधिक बळी हे बिहार राज्यातच गेले आहेत. ऑक्टोबर २०२२ मध्ये बिहार मध्येच विषारी दारू पिल्याने ७२ जण दगावले होते. मार्च २०२२ मध्ये १२ जण तर नोव्हेंबर २०२१ मध्ये ४२ जणांचा बळी गेला होता. आताही तिथेच पुन्हा ही दुर्दैवी घटना घडली आहे. मागील घेटनेतून कोणताही बोध न घेतल्यानेच अशा दुर्दैवी घटनांची पुनरावृत्ती होत आहे. विशेष म्हणजे बिहार राज्यात संपूर्ण दारू बंदी आहे. विषारी दारुकांडात ४० हून अधिक लोकांचा बळी गेल्यावर नेहमीप्रमाणे बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी चौकशीचे आदेश दिले आहेत. त्यासाठी एस आय टी नेमून संपूर्ण घटनेची चौकशी करून दोषींवर कायदेशीर कारवाई करण्याची घोषणा त्यांनी केली पण यातून विशेष काही हाती लागेल असे वाटत नाही. एखादी दुर्दैवी घटना घडली आणि त्यात काही नागरिकांचा बळी गेला की त्या घटनेची चौकशी करण्यासाठी चौकशी आयोग नेमणे ही आपल्या देशात नित्याची बाब आहे. पण त्या चौकशी आयोगाचे पुढे काय होते? त्यातून दोषींना शिक्षा होते का ? शिक्षा झाली तर मग अशा घटनांची पुनरावृत्ती का होते ? हे प्रश्न अनुत्तरितच राहतात. मुळात अशा घटना घडूच नयेत यासाठी सरकार काय प्रयत्न करते हे महत्वाचे आहे. विषारी दारू उत्पादित करून ती विकली जात असताना बिहार सरकार आणि तेथील पोलीस यंत्रणा काय करत होती हा खरा प्रश्न आहे. दारूची निर्मिती करणारे दारुमध्ये अल्कोहोल, धतुरा आणि युरिया टाकत होते अशी माहिती समोर आली आहे. ही दारू बनवण्यासाठी नवसागर आणि मिथाईल अल्कोहोल यासारख्या रसायनांचा देखील वापर केला जातो. हे सर्व पदार्थ मानवी शरीरासाठी हानिकारक आहेत. हे माहीत असतानाही त्याचा दारुसाठी सर्रास वापर केला जातो. आपल्या देशात विना परवाना दारू विक्री करणे हा गुन्हा असताना गाव खेड्यातच नव्हे तर शहरातही अवैध दारूच्या भट्ट्या जागोजागी दिसतात. या भट्ट्यांमध्ये अवैध पद्धतीने दारू उत्पादित केली जाते. हे पोलिसांसह प्रशासनाला देखील माहीत असते पण या दारू माफियांनी पोलिसांसह प्रशासनाचे देखील हात आधीच ओले केले असल्याने ते त्याकडे काणाडोळा करतात त्याचा परिणाम म्हणून अशा दुर्दैवी घटना घडतात. एखादी घटना घडली किंवा वरिष्ठ अधिकाऱ्यांचा दौरा असला तरच कारवाईचे नाटक केले जाते आणि काही दिवसांनी पुनश्च हरिओम होतो. दारू माफिया व पोलीस प्रशासनातील भ्रष्ट अधिकारी यांच्या अभद्र युतीम ुळेच अशा दुर्दैवी घटना घडतात. जोवर ही भ्रष्ट युती तुटत नाही आणि भ्रष्ट अधिकाऱ्यांवर कडक कारवाई होत नाही तोवर या घटना थांबतील असे वाटत नाही. या घटनेची देशभर चर्चा झाल्याने बिहार पोलिसांवरील दबाव वाढला त्यामुळे त्यांनी काही लोकांना अटक केली मात्र ही अटक केवळ दिखाव्यापुरती आहे. छोट्या माशांना अटक करून बिहार पोलीस कारवाईचा दिखावा करत आहेत. मोठे मासे म्हणजे दारू माफियांना गजाआड करण्याचे धाडस बिहार पोलीस दाखवू शकत नाही. अर्थात दारू पिणारे लोक त्यांच्याकडे येतात म्हणूनच ते दारू विकतात हे ही तितकेच खरे आहे. दारूच्या आहारी गेलेले लोक दारू मिळाली नाही तर जी दारू मिळेल ती पितात. आपण जी दारू पितो तिच्यामुळे आपला जीवही जाऊ शकतो याचेही त्यांना भान नसते.



दारू माफियांवर कारवाई करण्यासोबतच दारूच्या आहारी गेलेल्या लोकांचे सम ुपदेशन करून त्यांना व्यसनमुक्त करण्यासाठी देखील शासन स्तरावरून प्रयत्न व्हायला हवेत.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

### पान १ वरुन

## परजिल्ह्यातून खून ...

ग्रामीण पोलीस ठाण्याच्या पोलीस अधिकाऱ्यांच्या ताब्यात देण्यात आले. अशी माहिती पोलीसांनी दिली आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक अजय कुमार बन्सल व अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव, चंदनझिरा पोलीस ठाण्याचे पो.नि. सम्राटसिंग राजपुत, पोउपनि राजेंद्र वाघ, पोलीस अंमलदार संभाजी तनपुरे, देविदास भोजने, संजय सोनवणे, किशोर पुंगळे, सागर बाविस्कर, सर्व स्था. गु.शा.जालना व कृष्णा तंगे, साई पवार, राजु पवार आदींनी केली आहे.

# शेतकरीविरोधी कायदे रद्द करण्याच्या मार्गातील अडथळे

शेतकरी समस्येचे मूळ प्रामुख्ताने कमाल शेतजमीन धारणा (सीलिंग), आवश्यक वस्तू, जमीन अधिग्रहण या तीन कायद्यांमध्ये आहे, हे कायदे शेतकऱ्यांच्या हाता-पायातील बेड्या आहेत, गळफास आहे! हे बहुतेक विचारी लोकांनी मान्य केले आहे. जे कोणी शेतकरीविरोधी कायदे जाणून घेतात, त्यांची खात्री पटते.

आता प्रश्न असा आहे की, हे कायदे रद्द कसे होतील? त्यातून शेतकऱ्यांची सुटका कशी होईल? बेड्या कशा तुटतील?

**संसदीय पर्याय**

हे कायदे लोकसभा आणि विधानसभा या कायदे मंडळांनी केले आहेत, तेच हे कायदे रद्द ही करू शकतात. सभागृहात रीतसर हा कायदा रद्द करावा असा ठराव मांडायचा. बहुमत मिळाले की ठराव पास होतो. ठराव पास झाला की राष्ट्रपती किंवा राज्यपाल तसा आदेश काढतात.

एकाने ठराव मांडला तर त्याला बहुमत मिळेल का? शक्यता कमीच असते. बहुमत मिळावे यासाठी सरकार पक्षा कडून ठराव यावा लागेल. सरकार पक्ष कोण आहेत? केंद्रात एनडीए आहे. त्यात सर्वात जास्त खासदार भाजपचे आहेत. अनेक विधान सभां मध्ये देखील भाजपचे बहुमत आहे. काही राज्यांमध्ये काँग्रेसची सरकारे आहेत. इतर काही राज्यात इतर पक्षांची देखील सरकारे आहेत. भाजप आणि काँग्रेस हे सध्या सर्वात मोठे पक्ष आहेत. या पक्षां कडून शेतकरीविरोधी कायदे रद्द करण्याचा ठराव येऊ शकतो का? त्याची शक्यता आज दिसत नाही. काँग्रेसने हे कायदे केले आहेत. त्यांना हे कायदे रद्द करायचे असते तर १९९० साली जेंव्हा नरसिंहराव-मनमोहनसिंग सरकारने खुलीकरणाचे धोरण स्वीकारले तेंव्हाच रद्द केले असते, दुर्दैवाने ते तेंव्हा झाले नाही. पुढे अर्थतज्ञ मनमोहनसिंग प्रधान मंत्री झाले. त्यांनी खुलीकरणाच्या अनेक सुधारणा केल्या पण शेतीवरची सरकारी बंधने मात्र हटवली नाही.

भाजपचे याहून वेगळे नाही. २०१४ ला भाजपला पूर्ण बहुमत मिळाले. काँग्रेसला उठता-बसता शिव्या देणाऱ्या मोदी सरकारने काँग्रेस ने आणलेलता ता कायद्याना अजिबात धक्का लावला नाही, उलट हे कायदे राक्षसी पद्धतीने राबविले. मोदी सरकारने काही हजार मेलेले कायदे रद्द केले परंतु ज्या कायद्यानी शेतकरी मरत आहेत, त्या कायद्याना हात लावला नाही. एकंदरीत काय? कृषी प्रधान भारत देशातील दोन्ही प्रमुख पक्ष शेतकऱ्यांना बसलेला कायद्यांचा गळफास सोडवायला तयार नाहीत.

मग काय करायचे?

इतर कोणता असा राजकीय पक्ष आहे की जो बहुमतात येऊन हे कायदे रद्द करू शकेल. एक तर असे पक्षाचा नाहीत की ज्यांनी कमाल शेतजमीन धारणा कायदा, आवश्यक वस्तू कायदा, जमीन अधिग्रहण कायदा रद्द करू असा मुख्य कार्यक्रम जाहीर केला आहे. काही लोक सांगतात की तुम्ही तसा पक्ष काढा. समजा आम्ही पक्ष काढला, त्याला बहुमतात यायला किती वर्षे लागतील? शेतकरीविरोधी कायदे रद्द करण्याचा संकल्प असलेला पक्ष कोणी काढला तर मी त्याचे स्वागतच करेन.

शेतकरी याचक राहिला, विखुरलेला आणि विभाजित राहिला तरच तो आपल्याला मते देऊ शकेल, म्हणून त्याला कधीच स्वातंत्र्य मिलता कामा नये, हे या देशातील सत्ताधारी व विरोधी पक्षांनी ओळखले आहे. त्यांना निवडून येण्यासाठीचा पैसा कमविण्या साठी देखील शेतकऱ्यांच्या शोषणाची व्यवस्था कायम ठेवायची आहे. फार मोठे आरिष्टय कोसळल्या शिवाय भारतातील राजकीय पक्ष शेतकरी स्वातंत्र्याचा विचार करतील असे मला वाटत नाही

लोकसभा किंवा विधान सभेत हे कायदे रद्द होणार नसतील तर दुसरा मार्ग काय? दुसरा म ार्ग न्यायालयांचा आहे. हे कायदे शेतकरीविरोधी आहेत, पक्षपात करणारे आहेत, असंवैधानिक आहेत, असे सिद्ध करून न्यायालयाकडून रद्द करून घ्यायचे! पण ते एवढे सोपे नाही. या देशात शेतकऱ्यांसाठी काहीच सोपे नाही!

**न्यायालयीन लढाई**

१८ जून १९५१ रोजी पहिल्या घटना दुरुस्ती द्वारा मूळ घटनेत नसलेले एक नवे परिशिष्ट जोडण्यात आले. या परिशिष्टात समाविष्ट केलेल्या कायद्यांना अनुच्छेद ३१ ए व बी नुसार न्यायालयाच्या कक्षेच्या बाहेर ठेवण्यात आले. म्हणजे न्यायालये परिशिष्ट-९ मध्ये टाकलेल्या कायद्याबद्दल निर्णय करू शकत नाहीत. म करंद डोईजड (कोल्हापूर-पुणे) यांनी सर्वोच्च न्यायालयात या कायद्यांविरुद्ध एक याचिका दाखल केली होती. सुनावणी सुरू होण्या आधीच तत्कालीन मुख्य न्यायाधीश शरद बोबडे यांनी, 'सरकारकडे जा' असे सांगितले. सरकार करीत नाही म्हणून तर आम्ही न्यायालयात आलो आहोत, हे सांगूनही उपयोग झाला नाही.

खरे तर सुप्रीम कोर्टाच्या अलिकडच्या एका निवाड्यानुसार १९७४ नंतर (केशवानंद भारती खटल्याच्या निकालाची तारीख) परिशिष्ट ९ म ध्ये टाकलेल्या कायद्यांचा सुप्रीम कोर्ट पुनर्विचार करू शकते. पण दुर्दैवाने हे कायदे १९७४च्या आधीचे आहेत. आवश्यक वस्तू कायदा जरी १९७६ मध्ये परिशिष्ट ९ मध्ये समाविष्ट केला असला तरी घटना दुरुस्तीच्या तरतुदीनुसार तो कायदा निर्माण झाला तेंव्हा पासून तो समाविष्ट केला आहे, असे मानले जाते. हा कायदा १९५५ ला निर्माण झाला होता. म्हणजे तोही १९७४च्या आधीचाच मानला जाऊ शकतो.

**मुलभूत अधिकार श्रेष्ठ की मार्गदर्शक तत्वे श्रेष्ठ हाही मोठ्या वादाचा मुद्दा राहिला आहे.**

अनेक अडथळे असले तरी अजूनही कोर्टात जाण्यासाठी बरेच मुद्दे बाकी आहेत. मला वाटते, सुप्रीम कोर्टाबद्दल भले काही-बाही बोलले जात असले तरी तो शेतकऱ्यांसाठी दाद मागण्याचा एक दरवाजा आहे. ज्यांना शेतकरी स्वातंत्र्याची तळमळ आहे, त्यांनी सुप्रीम कोर्टाचे दार ठोठावयला विसरू नये, एकदा, दोनदा, तीनदा!

**जनआंदोलन**

तिसरा आणखीन एक मार्ग आहे, जनआंदोलनाचा! पण आंदोलन म्हणजे काय? भावनांचा भडका म्हणजे आंदोलन असा बहुतेकांचा समज असतो.

शेतकरी प्रश्न हा खरे तर बुद्धीचा विषय आहे. तुम्हाला तो नीट समजला पाहिजे. येथे तर कायदे विचारात घ्यायचे आहेत! शेतकरीविरोधी कायदे रद्द करण्याची आंदोलन रूढ आंदोलनासारखे 'गर्दी जमाव-भडका उठाव' पद्धतीचे असणार नाही. त्यासाठी वेगळे तंत्र आणि मंत्र स्वीकारावे लागेल.



**अमर हबीब**
**किसांनपुत्र आंदोलन**
**अंबाजोगाई, ८४११९०९९०९**

# 'महाराष्ट्र मंदिर महासंघा'कडून बेकायदेशीर खरेदी प्रकरण रद्द करण्याची शासनाकडे मागणी!

## सोमेश्वर देवस्थानानंतर श्री काळेश्वर महादेव संस्थानची कोट्यवधी रुपयांची जमीन लाटण्याचे षड्यंत्र!

**अमरावती । प्रतिनिधी -** जिल्ह्यातील श्री सोमेश्वर देवस्थानची ५० कोटी रुपयांची जमीन कवडीमोल भावात विकण्याचा घोटाळा ताजा असतांना आता दर्यापुर तालुक्यातील श्री काळेश्वर महादेव संस्थानची कोट्यवधी रुपयांची जमीन लाटण्याचे दुसरे धक्कादायक प्रकरण सम ोर आले आहे. या संदर्भात 'महाराष्ट्र मंदिर महासंघा'चे कोअर टीमचे राज्य पदाधिकारी श्री. अनुप जयस्वाल आणि महासंघाचे अमरावती जिल्हा निमंत्रक श्री. कैलास पनपालीया यांनी दर्यापुरचे तहसिलदारांकडे लेखी तक्रार आहे. सदर देवस्थानच्या जम ीनीच्या खरेदीचे बेकायदेशीर प्रकरण तात्काळ रद्द करण्याची आग्रही मागणी केली आहे.

पूर्वी 'श्री काळेश्वर महादेव संस्थान' या नावाने प्रसिद्ध असलेले देवस्थान 'श्री कोंडेश्वर महादेव संस्थान' या नावाने ओळखले जाते. या मंदिराच्या मालकीच्या भुजवाडा, ता. दर्यापुर, जि. अमरावती येथे शेत गट क्र. ६८ व ९२ या शेतजमीन आहे. सदर शेतजमीनी संस्थानला अनुक्रमे वर्ष १९१० व वर्ष १९१२ ला मिळालेल्या होत्या. सदर शेतजमीनीमधून मिळणारे उत्पन्नातून संस्थानवर खर्च होणे अपेक्षीत असतांना जमीन कब्जेदाराकडून कोणत्याही प्रकारचा मोबदला मंदिराला मिळत नाही. तसेच हे मंदिर अत्यंत जीर्ण अवस्थेत आहे. या संस्थानचे सर्व विश्वस्त मृत झाल्याचा फायदा घेत सदर १५ एकर शेतजमीनीपैकी ६ एकर जमीन हडप करण्यासाठी दर्यापूर तहसिलदारांकडे शेतजमीनी खरेदी प्रकरण सुरू करण्यात आलेले आहे. या संदर्भातील खरेदीसाठीचा अर्ज पुरूषोत्तम पुंडलिकराव टाले यांनी केला आहे. खरे तर मंदिराच्या जमीनीचे संरक्षण करण्याची जबाबदारी शासन आणि न्यायालय यांची असल्याचे निर्देश यापूर्वीच मा. सर्वोच्च न्यायालयाने विविध न्याय-निवाड्यात दिलेले आहेत. तसेच कायद्यानुसार देवस्थानच्या जमीनीना कुळ कायदा लागू नसतांना महसूल विभागातील काही अधिकारी आपल्या पदाचा गैरवापर करून बेकायदेशीररित्या शेतजमीनी इतरांच्या घश्यात घालत आहे. या मंदिराला कुळ कायद्याच्या तरतुदीनुसार सूट प्रमाणपत्र



प्राप्त असल्याने मंदिराची शेतजमिनीला विक्री प्रमाणपत्र देण्याचे तहसिलदारांकडील प्रकरण त्वरीत रद्द करून दफ्तरी दाखल करण्याची मागणीही मंदिर महासंघाने केली आहे. शेतजमिनी प्रकरणात मंदिर महासंघाच्या वतीने पुढील पाठपुरावा सुद्धा करण्यात येणार आहे. सदर निवेदन देतांना दर्यापूर येथील मंदिराचे हितचिंतक सर्वश्री प्रदिप मलिये, गौरव बैताडे, ओम राणे, संदीप राजगुरे, गजानन शेंडोकार, अक्षय सरडे, दिनेश धोत्रे, तेजस गीरी आदी उपस्थित होते.

**मंदिर महासंघातर्फे राज्यव्यापी अभियान !**

संपूर्ण महाराष्ट्रात मागील काही काळापासून असे अनेक गैरप्रकार सुरू झाले असून याला आळा घालण्यासाठी महाराष्ट्र शासनाने पुढाकार घेणे गरजेचे झाले आहे. तसेच असे प्रकरण अन्य कुठे होत असल्याचे निदर्शनास आल्यास सर्व माहितीसह त्या विषयी मंदिर महासंघाला कळवण्यात यावे. या विरोधात लवकरच मंदिर महासंघातर्फे राज्यव्यापी अभियान चालवण्यात येणार असल्याची माहिती मंदिर म हासंघाचे राष्ट्रीय संघटक श्री. सुनील घनवट यांनी दिली आहे.

### पान १ वरुन

## परशुराम आर्थिक ...

यावेळी मार्गदर्शन करताना दिली. तसेच संघर्ष योद्धांचे स्वागत केले.

**आ.कैलास गोरट्याल यांनी भरिव तरतूद न झाल्याची व्यक्त केली खंत**

समाजाच्या आर्थिक महामंडळची स्थापना झाली ही बाब या समाजासाठी निश्चित सकारात्मक म्हणावी लागेल, परंतु भरीव तरतुद करणे आवश्यक होते ती केली नाही. ती खंत कायम असून राज्यात महाविकास आधाडीचे सरकार आल्यास या महामंडळासाठी अधिकचा निधी देण्यासह महाम डळाच्याअध्यक्षपदी जालन्यातील समाजबांधवाला आपण संधी देऊ यासाठी आपण प्रयत्न करू अशी ग्वाही गोरंट्याल यांनी दिली. पद्मशाली समजल देखील विनकर महामंडळाकरिता शंभर कोटी रुपये दिले आहेत, असल्याचे तसेच खोतकरांचे नाव न घेता सर्व कामे केली आपण केली असल्याचे श्रेय अनेक जण श्रेय घेत असल्याचा उल्लेख त्यांनी केला.

ब्राह्मण समाज हा पूर्वीपासून प्रमाणिक,नम्र आणि विनयशीलआहे. मार्गदर्शकाच्या भूमिकेतच तो नेहमी राहिलेला आहे. त्याच्याकड़ेअसलेली व बुद्धी या भूमिका जोरावर त्याने मार्गदर्शकाची बजावण्याची परंपरा जपली आहे.भविष्यातही नव्या पिढीनेही परंपरा आणि सनातन वैदिक धर्माचे रक्षण तसेच त्याच्यावृद्धीसाठी झोकून देऊन काम करणेगरजेचे असल्याचे प्रसिद्ध भागवतकार विश्वासमहाराज गोंदीकर यांनी यावेळीनमूद केले.

ब्राह्मण समाज हा गरिबीतच जगला आहे. काही बोटावरम ोजता येतील एवढा लोकांनी उच्च शिक्षण घेऊन मोठी शहरे आणि वेगवेगळ्या प्रातांत त्यांचे नाव उज्वल केले आहे. कुठल्याही क्षेत्रात आपला समाज मागे नाही. अनेकजण गरिबीतूनही उदरनिर्वाह भागवत असले तरी त्यांनी स्वाभिम ान सोडलेला नाही. हे आर्थिक विकास महामंडळ स्थापन झाल्याने गरजू आणि होतकरूना निश्चितपण आर्थिक मदत मिळून त्यांची प्रगती होईल हा विश्वास जाफराबाद येथील नवनाथ संस्थानचे मठाधिपती भास्कर महाराज देशपांडे यांनी व्यक्त केला.


समाजाच्या सर्वागीण प्रगतीमध्ये ब्राह्मण समाजाने निश्चितच मोठावाटा उचलेला आहे. आपले अनेकमित्र याच समाजातील असून संकट काळातत्यांनी आम्हाला मोठी मदत केली आहे.हा समाज अल्प संख्याकअसला तरी सर्वाना सोबत घेऊन चालतो.एकूणच या आर्थिक विकास महामंडळामुळेया समाजातील गरिबांना न्याय मिळेल असे सांगून परपरा जपतानाच हा समाज तेव्हढाच परिवर्तशील असून या सम ाजाला मोठा गौरवशाली इतिहास असल्याचे माजी आ.अरविंद चव्हाण यांनी सांगितले.

परशुरामआर्थिक विकास महामंडळ स्थापनेसाठी ज्या ज्या संघर्ष योद्धांनी मदत केली. त्यांचे कौतुकच केलेपाहिजे. ब्राह्मण समाज नेहमीच प्रामाणिक आणि विनयशीलता असल्याबाबतओळखलाजातो.

आगामी काळात आपण यमहामंडळाला अधिकची तरतूद कशीकरून घेता येईल यासाठी पाठपुरावा करू असे आश्वासन देऊन योद्धांचा सत्कार हा उपक्रम स्तुत्य असल्याचे भाजपाचे विधानसभा प्रमुख भास्करदानवे यांनी आपल्या भाषणातूनसांगितले.

यावेळी समाजातील बहुसंख्य ब्रह्मवृंद उपस्थित होते, कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ड.सुनील किनगावकर,रम ेश देहेडकर,रवींद्र देशपांडे,भगवान पुराणिक,सतीश अकोलकर,रमण उपाध्ये,सुरेंद्र न्यायाधीश, सुहास सदावर्ते यांनी प्रयत्न केले आभार प्रदर्शन श्रेयानाईक यांनी केले

# सार्वजनिक ठिकाणी नशापाणी करणाऱ्यांना पोलीसांनी घेतले ताब्यात



**जालना । प्रतिनिधी -** शहरातील संजय नगर भागात असलेल्या जुन्या तहसील कार्यालय परिसरामध्ये तसेच गांधी चमन भागात असलेल्या जिल्हा स्त्री रुग्णालय परिसरामध्ये काही लोक नशा पाणी करत असल्याचे कदिम जालना पोलिसांना गुप्त माहिती मिळाली होती.यावरून दि.२० रविवार रोजी रात्री आठ वा.च्या सुमारास पोलीस निरीक्षक सिद्धार्थ माने यांनी दोन पथके तयार करून जुने तहसील कार्यालय येथे आणि जिल्हा स्त्री रुग्णालय येथे वेगवेगळे पथक पाठवले असता दोन्ही ठिकाणी मिळून पाच जणांना पोलीसांनी ताब्यात घेतले आहे. सदरील संशयित आरोपी सार्वजनिक ठिकाणी नशा पाणी करत असल्याचे पोलिसांना आढळून आले त्यावरून कारवाई करण्यात आली आहे. दि.२१ सोमवार रोजी सकाळी दहा वा. च्या सुमारास माध्यमांशी बोलताना पो.निरि. सिद्धार्थ माने म्हणाले की नागरिकांनी सार्वजनिक ठिकाणी किंवा इतर कोठेही नशा पाणी करू नये सध्या सण उत्सवाचे दिवस असून विधानसभे च्या निवडणुकीची आचारसंहिता लागू आहे. शहरांमध्ये ठीक ठिकाणी पोलिसांच्या वतीने कडक बंदोबस्त असून प्रत्येक बाबीवर करडी नजर ठेवण्यात आलेली आहे. त्यामुळे कोणीही गैरकृत्य करत असलेले आढळून आल्यास पोलिसांच्या वतीने कडक कारवाई करण्यात येईल. ही कारवाई पोलीस निरीक्षक सिद्धार्थ माने, डीबी पथकाचे पोलीस उपनिरीक्षक नागरे, पोलीस उपनिरीक्षक वनवे यांच्या पथकाने केली आहे.

## जगन बुरकूल यांना आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान




**जाफराबाद । प्रतिनिधी -** डॉ. पंजाबराव देशमुख राष्ट्रीय शिक्षक परिषदेकडून देण्यात येणारा महात्मा ज्योतिराव फुले राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार सातेफळ ता. जाफराबाद येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेचे उपक्रमशील शिक्षक जगन बुरकूल यांना रविवारी ता.२०जालना येथे आयोजित समारंभात प्रदान करण्यात आला.जालना येथील मराठा सेवा संघ कार्यालयात आयोजित समरंभात परिषदेचे संस्थापक अध्यक्ष पप्पू भोयर, ज्येष्ठ समाजसेवक आर. आर. खडके, सतीश काळे,काकासाहेब खरात , गजानन देशमुख, लक्ष्मण नेव्हल प्रदेशाध्यक्ष यांच्या हस्ते सदर पुरस्कार प्रदान करण्यात आला.श्री बुरकूल यांना हा पुरस्कार मिळाल्याबद्दल केंद्रप्रमुख गजानन मांटे यांच्यासह सातेफळ जिल्हा परिषद शाळेचे सर्व शिक्षक व ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे.

माझी शाळा सुंदर शाळा अभियान

# जेबीके व नवभारत कनिष्ठ महाविद्यालय जाफराबाद तालुक्यातून प्रथम

**टेंभूर्णी । प्रतिनिधी -** मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियानाच्या दुसऱ्या टप्प्यात टेंभुर्णी (ता. जाफ्राबाद) येथील नवभारत शिक्षण संस्था संचलीत जमुनाबई बाळाराम काबरा विद्यालय व नवभारत कनिष्ठ महाविद्यालय संस्था गटातून तालुक्यातून प्रथम क्रमांक पटकावला असून, पुरस्कार स्वरुपात शाळेला रोख ३ लाख रुपये बक्षिस मिळणार आहे.

आकर्षक शाळा परिसर व इमारत, उपलब्ध असणाऱ्या सर्व भौतिक सोयी-सुविधा, विविध आकर्षक व उपयोगी वृक्षांची लागवड व जोपासना, उत्कृष्ट शैक्षणिक गुणवत्ता, क्रीडा स्पर्धेत मिळवलेले यश या बाबींच्या आधारे जेबिके विद्यालयाने तालुक्यात प्रथम येण्याचा मान पटकावला आहे. मामा प्राध्यापक डॉक्टर आनंद जाधव यांच्या नेतृत्वात, शाळेने माझी शाळा मुख्यमंत्री शाळा या योजनेमध्ये भाग घेऊन, प्रथम क्रमांक पटकावला असताना सर्व शाळेतील शिक्षकांनी त्यांना मदत केली. प्रथम क्रमांक पटकावल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष संजय काबरा, उपाध्यक्ष शेख जमिर, सचिव सत्यनारायण सोनी कोषाध्यक्ष सुभाष राठी, ज्येष्ठ संचालक रामनारायण काबरा, ज्येष्ठ संचालक तथा माजी अध्यक्ष सुरेश शेठ काबरा, ज्येष्ठ संचालक तथा माजी सचिव प्रेमसुख काबरा, संचालक तथा माजी सचिव प्रल्हाद टेंभुर्णीकर, संचालक राजीव काबरा, संचालक दीपक काबरा, संचालक मधुकरावनिकम, विश्वनाथराव सांगोळे संचालक तथा उप प्राचार्य प्रा. दत्ताजीराव देशमुख, प्रदिप काबरा, प्रदिप मुळे यांच्यासह संचालक मंडळाने प्राचार्य नंदकुमार काळे, उपमुख्याध्यापक पंजाब सोळंके, पर्यवेक्षक धनंजय पुराणे, एस. बी. बोरकर, क्रिडा विभागप्रमुख कैलास भुतेकर, नवभारत शिक्षक पतसंस्थेचे चेअरमन प्रा. कैलास जाधव, क्रिडा मार्गदर्शक राजेश शेवाळे, ज्येष्ठ शिक्षक संजय कुलकर्णी, गणेश सावसक्के, रमेश इंगळे, विष्णू जाधव, समाधान कांबळे, संजय कुलकर्णी, वासुदेव क्षीरसागर, समाधान कांबळे दत्ता उखर्डे, भिवसन ससाणे, राजेंद्र जगताप, प्रा. सुनिल बनसोडे, प्रा. अरुण आहेर, रविंद्र मोरे, , प्रा. रामदास भांगे, प्रा. गजानन धोटे, प्रा. डॉ. आनंद जाधव, , उज्वला औटी, माधुरी पाटील, एफ.




एम. शेख, मंजुषा भिलावेकर, ज्योतीताई जाधव, राजु डोमळे, विजया शिल्लार, नागोराव देशमुख, दगडुबा तांबेकर, दिपक देशमुख यांचे अभिनंदन केले आहे.

---

## भाजपाच्या कार्यकर्त्यांचा शरद पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश



**जाफराबाद । प्रतिनिधी -** माजी आमदार चंद्रकांत दानवे यांच्या भोकरदन येथील संपर्क कार्यालयात मौ.बुटखेडा, गाडे गव्हाण या जाफराबाद तालुक्यातील भारतीय जनता पक्षाच्या असंख्य कार्यकर्त्यांनी चंद्रकांत दानवे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षामध्ये प्रवेश केला. यावेळी भगवानराव बनकर (मा.सरपंच), दिगंबर बनकर (माजी चेअरमन), विलास बनकर (मार्केट कमिटी संचालक), भगवान देठे माजी सरपंच, प्रभू बनकर, कैलास बनकर, विश्वास देठे यांनी जाहीर प्रवेश केला आहे. त्याच बरोबर बुटखेडा तालुका जाफराबाद येथील भाजपाचे ज्येष्ठ कार्यकर्ते दादाराव धमर्जी सरोदे, भीमराव देवराव पांडव, सचिन बाबुराव पांडव, संजय पांडव यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षामध्ये प्रवेश केला आहे. यावेळी जाफराबाद राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे तालुका अध्यक्ष रामधन कळंबे, उपाध्यक्ष रघुनाथ पंडित, रमेश राठोड, रमेश पवार, विलास आढे, अनिल पवार, रामदास स्वामी आदींची उपस्थिती होती.

भोकरदन शहरातील विठ्ठल रुख्मिणी नगर येथील रविराज पुंड यांनीसुद्धा यावेळी आपल्या कार्यकर्त्यांसह राष्ट्रवादीत प्रवेश केला.

# परतूर तालुका कॉंग्रेस कमिटी च्या वतीने आधुनिक बुथ कमिटी प्रशिक्षण शिबिर

### प्रभारी पक्ष निरीक्षक महेश शर्मा यांची प्रमुख उपस्थिती

**परतुर । प्रतिनिधी -** परतुर-मंठा विधानसभा मतदार संघातील कॉंग्रेस पक्षाचे बुध कमिटी प्रशिक्षण ३५९ बुध करिता आयोजित करण्यात आले होते. बुध कमिटीच्या प्रशिक्षणाला तालुक्यातील बुथ कमिटी पदाधिकारी मोठया संख्येने सहभागी झाले होते .या वेळी बुथ कमिटीला संबोधित करताना प्रभारी पक्ष निरीक्षक महेश शर्मा म्हणाले की तुम्ही सुरेश जेथलिया यांना आमदार बनवा मंत्रीपद देण्याची जिम्मेदारी मी घेतो.उमेदवारीबद्धल कुठलाही संभ्रम मनामध्ये बाळगू नका. परतूर विधानसभेची जागा ही कॉंग्रेस पक्षच लढावणार असून तनमण धनाने कामाला लागा असे सुचक वक्तव्य प्रभारी पक्ष निरीक्षक महेश शर्मा यांनी बुथ प्रशिक्षण शिबीरात मार्गदर्शन करताना त्यांनी प्रतिपादन केले, या वेळी प्रशिक्षणाला सुरेश जेथलिया, बालासाहेब देशमुख, नितीन जेथलिया, विशाल तौर, बाबाजी गाडगे, बाळासाहेब अंभिरे, इंद्रजीत घनवट, लक्ष्मण शिंदे, मंजुळदास सोळंके, बाबुराव हिवाळे, रहेमु कुरेशी, सादेक खतीब, राजु भुजबळ, अण्णासाहेब खंदारे, माऊली वायाळ, सुरेश सवणे, पांडू कुरधने, मंजुळदास सोळंके, सिद्धू सोळंके, पंजाब देशमुख, प्रफुल्ल शिंदे, हाजी रहमत खान, सादिक जागीरदार, अजीम कुरेशी, अविनाश शहाणे, आंबेकर, सिद्धू अंभोरे, अमीर पठाण, हाशमी महिला असंघटित कामगार कॉंग्रेस ता.अ. सारीका सरवणकर, अलका कोळे महिला कॉंग्रेस तालुकाध्यक्ष परतुर आदी पदाधिकारी कार्यकर्ता मोठया संख्येने उपस्थित होते.



---

# नालंदा बुद्ध विहार मोर्बा येथे वर्षावास धम्म प्रवचन मालिकेचा सांगता

### विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती

**बोरघर । माणगाव । प्रतिनिधी -** मोर्बा बौद्ध सेवा संघ ग्रामीण, मुंबई आणि आम्रपाली महिला मंडळ मोर्बा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित वर्षावास धम्म प्रवचन मालिकेचा सांगता समारोह नालंदा बुद्ध विहार मोर्बा येथे रविवार दिनांक २० ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी १०.०० ते सायंकाळी ५ . ०० या वेळेत निलेश महादेव साळवी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. सकाळी १० वाजता धम्म ध्वजारोहण भावकीचे तथा मोर्बा बौद्धजन सेवा संघाचे जेष्ठ सल्लागार तुकाराम तानु मोरे यांच्या हस्ते करण्यात आले. त्या नंतर १०.१५ वाजता धम्म संस्कार विधी बौद्धाचार्य लक्ष्मण मोरे आणि बौद्धाचार्य धनाजी मोरे यांनी केले. ११.३० वाजता प्रमुख मान्यवर आणि प्रमुख पाहुणे यांचा स्वागत सत्कार समारंभ संपन्न झाला. त्यानंतर दुपारी १ : ०० वाजता स्नेह भोजन त्या नंतर दुपारी २ : ०० वाजता दुसऱ्या सत्रात सुर्यकांत कासे सर यांचे पंचशील आष्टांगिक मार्ग या विषयावर धम्म प्रवचन झाले.

कार्यक्रमाची सुरुवात तथागत भगवान गौतम बुद्ध आणि विश्वरत्न, महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्प मालिका अर्पण करून आदरणीय बौद्धाचार्य यांच्या मंगल वाणीने धम्म संस्कार विधीने करण्यात आली. सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन संदेश मोरे कार्याध्यक्ष मुंबई. व नितेश साळवी सचिव मुंबई यांनी केले. तर आभार प्रदर्शन महेश मोरे यांनी केले. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मोर्बा बौद्धजन सेवा संघ स्थानिक, मुंबई आणि आम्रपाली महिला मंडळ मोर्बा चे आजी माजी पदाधिकारी यांनी तब्बल तीन महिने निरंतर अथक असे परीश्रम घेतले. सदर कार्यक्रमास उपस्थित विविध क्षेत्रातील सर्व प्रतिष्ठीत मान्यवरांचे आयोजकांच्या माध्यमातून पुष्प गुच्छ आणि शाल देऊन स्वागत करण्यात आले. तर संविधान प्रश्न



मंजुषा परिक्षेत सहभागी विद्यार्थ्यांना आयोजकांच्या माध्यमातून प्रशस्तीपत्र देऊन गौरवण्यात आले. या नंतर मान्यवरांचे मनोगत आणि त्या नंतर स्नेह भोजन तर दुसऱ्या सत्रात वर्षावास धम्म प्रवचन मालिकेच्या सांगता समारोह प्रसंगी सुर्यकांत कासे सरांचे अष्टांगिक मार्ग या विषयावर धम्म प्रवचन झाले. त्या नंतर सदर कार्यक्रमाची सु सांगता करण्यात आली.

कार्यक्रमास एडव्होकेट यशवंत गंगावणे अध्यक्ष माणगाव तालुका बौद्ध समाज समन्वय समिती, प्रा. डॉ. धनराज वाघमारे डॉ बाबासाहेब आंबेडकर तंत्र शास्त्र विद्यापीठ लोणेरे , प्रा. डॉ. पी. बी. लोखंडे डॉ बाबासाहेब आंबेडकर तंत्र शास्त्र विद्यापीठ लोणेरे, सुर्यकांत कासे वर्षावास धम्म प्रवचन मालिकेचे प्रवचनकार, नुरखा पठाण संविधान कृती समिती माणगाव, अस्लम राऊत मा. सभापती रायगड जिल्हा परिषद, शौकत रोहेकर सरपंच ग्रुप ग्रामपंचायत मोर्बा, किर्तिराज शिर्के मा. बौपंस सचिव रायगड, अब्दुल्ला जालगावकर अध्यक्ष मुस्लिम समाज मोर्बा, पत्रकार विश्वास गायकवाड उपाध्यक्ष माणगाव प्रेस क्लब, रणजित मोहिते दुय्यम सचिव बौपंस माणगाव, अमोल मोहिते सचिव बौपंस खरवली विभाग, संदेश कासारे संदेश वाहक बौपंस खरवली विभाग, चंद्रकांत गायकवाड अध्यक्ष सर्वहारा ज. आं. माणगाव, महेंद्र गायकवाड मा. सहायक गट विकास अधिकारी पं.स.का. माणगाव, प्रकाश ओव्हाळ मा. अध्यक्ष बौपंस शाखा क्र. ८, सुजाता कासे राजिप शिक्षिका, कविता साबळे राजिप शिक्षिका, एडव्होकेट तेजस कासे इंडियन लिगल प्रोफेशनल असोसिएशन, एडव्होकेट राकेश मोरे भारत मुक्ती मोर्चा माणगाव, दिपक मोरे बुद्धिस्ट इंटरनॅशनल नेटवर्क, महादेव पवार अध्यक्ष दहिवली, जुल्फिकार राऊत सदस्य ग्रुप ग्रामपंचायत मोर्बा, विजय फोफलुनकर तंटा मुक्त अध्यक्ष ग्रुप ग्रामपंचायत मोर्बा, एडव्होकेट विलास गोठल मा. सरपंच ग्रुप ग्राम पंचायत मोर्बा, बाळकृष्ण पवार अध्यक्ष महादपोली, विठ्ठल मौले सचिव महादपोली, मनोहर जाधव सचिव देगाव, संतोष जाधव सचिव डोंगरोळी, नितीन शिर्के अध्यक्ष भीमनगर, अक्षय जाधव ऑडिटर शाखा क्रमांक ८, अलिभाई अकलेकर, हुसेन राऊत, रोहिदास मोरे, सदानंद ओव्हाळ, अतिष ओव्हाळ, मालु शिंदे, सुधीर मर्चंडे, दत्तुराम मोरे, बौद्धाचार्य गोविंद तांबे, जावेद शेख, संतोष पाबरेकर, अजय वानखेडे, बौद्धाचार्य दिपक शिर्के , विनोद पवार, मोर्बा बौद्धजन सेवा संघ स्थानिक अध्यक्ष निलेश साळवी, उपाध्यक्ष सुशील मोरे, सचिव धनाजी मोरे, दुय्यम सचिव राजेंद्र मोरे, खजिनदार मंगेश मोरे, दुय्यम खजिनदार सागर मोरे, संदेशवाहक बाळकृष्ण मोरे, माजी अध्यक्ष प्रशांत मोरे, माजी उपाध्यक्ष मोतीराम जाधव, माजी सचिव महेश मोरे, माजी खजिनदार देवेंद्र मोरे, सल्लागार लक्ष्मण मोरे, जेष्ठ सल्लागार तुकाराम मोरे, जेष्ठ सल्लागार बंडू मोरे, बौद्धजन सेवा संघ मोर्बा मुंबई अध्यक्ष भिकू मोरे, उपाध्यक्ष रघू मोरे, कार्याध्यक्ष संदेश मोरे, सचिव नितेश साळवी , उप सचिव दिनेश मोरे, खजिनदार बिपिन मोरे, मा. उपाध्यक्ष रमेश मोरे, माजी सचिव सिद्धार्थ मोहिते, माजी उपसचिव आदेश मोरे, माजी कार्याध्यक्ष विशाल मोरे, माजी सचिव सचिन जाधव, माजी खजिनदार राजेंद्र साळवी, आम्रपाली महिला मंडळ अधक्षा सुरेखा मोरे, उपाध्यक्षा संगिता मोरे, सचिव रुपाली मोरे, खजिनदार मनिषा मोरे, उप खजिनदार अस्मिता मोरे, सल्लागार अलका हाटे, माजी अध्यक्षा स्मिता मोरे, माजी उपाध्यक्षा रेखा मोरे, माजी सचिव संस्कृती जाधव, माजी उपसचिव मंजुळा साळवी, माजी खजिनदार संगिता मोहिते, माजी उप खजिनदार राजश्री मोरे, बौद्धजन सेवा संघ मोर्बा स्थानिक मुंबई आजी माजी पदाधिकारी, सभासद, सदस्य आणि आम्रपाली महिला मंडळ आजी माजी महिला पदाधिकारी सभासद सदस्य धम्म उपासक आणि उपासिका तसेच माणगाव तालुका आणि मोर्बा विभागातील सामाजिक कार्यकर्ते, विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर धम्म उपासक आणि धम्म उपासिका, बौद्ध धम्म अनुयायी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# निवडणुकीत सोशल मीडियावर बदनामी केल्यास कारवाई

### सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन खामगळ यांनी दिला इशारा

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** विधानसभा निवडणुकीची आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली असून आदर्श आचारसंहितेचा भंग होऊ नये यासाठी पोलीस प्रशासन क्शन मोडवर आले आहेत सोशल मीडियाद्वारे अफवा पसरून उमेदवाराबाबत आक्षेपार्य मजकूर प्रसारित केल्यास कारवाई सामोरे जावे लागणार असल्याचे टेंभुर्णी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन खामगळ यांनी सांगितले.

त्या अनुषंगाने सोशल मीडियाच्या ग्रुप डमिन सह नीट करांना नोटीसा देण्यात आल्याचे श्री खामगाव यांनी स्पष्ट केले मतदान आणि प्रचारादरम्यान कोणीही गैरकृत्य करू नयेत तसेच विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागलेली असल्याने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल असे कोणतेही कृत्य सोशल मीडियाच्या माध्यमातून केल्यास कारवाईचा इशाराही त्यांनी दिलेला आहे जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी आणि पोलिसांच्या सूचनाचे पालन केल्यास संबंधितांना जबाबदार धरून कारवाई केली जाईल तसेच ही नोटीस पुरावा म्हणून ग्राह्य धरण्यात येईल असेही श्री खामगळ यांनी सांगितले.



**सेटिंग ओन्ली फॉर एडमिन करा**

सोशल मीडियावरील सर्व नेटकरांनी व ग्रुप डमिन यांनी आदर्श आचारसंहितेचा भंग होणाऱ्या पोस्ट सोशल मीडियावर टाकल्या जाणार नाहीत यासाठी सेटिंग फॉर ओन्ली एडमिन करून घ्यावे जेणेकरून निवडणूक काळात आक्षेपार्य पोस्ट ग्रुप वर येणार नाहीत असे श्री खामगळ यांनी स्पष्ट केले.

**पोलिसांनी दिलेल्या महत्त्वाच्या सूचना**

कोणत्याही उमेदवाराची कुटुंबीयांची सामाजिक स्तरावरून अवेल न होईल अशी आक्षेपार्य टीका टिप्पणी करू नका

फोटो व्हिडिओ बनवून प्रसारित करू नका

अशा पोस्टवर सोशल मीडियात व्यक्तही होऊ नका

मतदारांचे मन वळविण्यासाठी कोणत्याही धर्म जातिबाबत द्वेष पसरणाऱ्या पोस्ट करू नका

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय एकात्मतेला बाधा निर्माण होईल अशा प्रकारचे वर्तन सोशल मीडियावर करू नका

दोन गटात समाजात जातीत वाद निर्माण होईल अशा पोस्ट सोशल मीडिया टाळाव्यात.

---

## लाडकी बहीण योजना बंद होणार नाही - शिंदे

**मुंबई -** सध्या दिवाळी जवळ आली आहे, पण त्याआधीच विरोधकांच्या बुडाखाली फटाके फुटू लागले आहेत. २३ तारखेच्या निकालाच्या दिवशी महायुतीच्या विजयाचा धमका होईल तो आयटम बॉम्बसारखा असेल. २३ नोव्हेंबरला चंदू भय्यांच्या विजयाचे फटाके फुटल्याशिवाय राहणार नाहीत. चंद्रकांत पाटील बाळासाहेब ठाकरेंचा कडवट आणि सच्चा शिवसैनिक आहे. मागच्या दोन ते अडीच वर्षांत मुक्ताई नगर मतदारसंघात पाच हजार कोटींचा निधी आपण दिला आहे. आपल्या महायुतीच्या आमदारांच्या मतदारांच्या मतदारसंघात निधी दिला आहे. मी दोन्ही हाताने देण्याचं काम करणारा मुख्यमंत्री आहे हे विसरु नका. देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार हे दोन्ही मुख्यमंत्री , तसंच मंत्री गुलाबराव बसले आहेत. मी जेव्हा सांगितलं की लाडकी बहीण योजना ( डरवज्ञळ इरहळप धेक्षरपर ) करायची आहे ते व्हा विरोधकांना ही निवडणुकीपुरती घोषणा वाटली. पैसे येणार नाहीत, योजना कागदावर राहिल. पण तसं घडलं नाही. मी आनंद दिघे आणि बाळासाहेबांचा शिवसैनिक आहे. एक बार मैने कमिटमेंट कर दी तो मै खुदकी भी नहीं सुनता. असा डायलॉगही मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी लगावला.

# मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासाकरिता गेल्या पाच वर्षात सात हजार कोटी रुपयांचा निधी आणला - लोणीकर

## कोकेश्वरी मंगल कार्यालय कोकरसा येथे तळणी व जयपूर सर्कल मधील कार्यकर्त्यांची आढावा बैठक

**मंठा । प्रतिनिधी -** परतूर विधानसभा मतदारसंघात शेगाव पंढरपूर दिंडी महामार्ग या सह प्रमुख राज्य मार्ग महामार्ग जिल्हा मार्ग गावा गावाला जोडणारे रस्ते, प्रत्येक रस्त्यावर पूल, गावागावातील तांडे वाड्या वस्त्यावरील पाणंद रस्ते परतुर शहरातील उड्डाणपूल, स्वर्गीय भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी वातानुकूलित नाट्यगृह, वंदनीय विश्वरत्न परम पूज्य डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलींचे वसतिगृह तालुका व जिल्हा सत्र न्यायालयाच्या इमारती, क्रीडा संकुल, गावा गावात २४ तास वीज उपलब्ध होण्यासाठी नवीन पोल व डिप्या करीता आणी मतदार संघाच्या सर्वांगीन विकासासाठी आपण केंद्र व राज्य सरकार च्या माध्यमातून गेल्या पाच वर्षात सात हजार कोटी रुपये निधी उपलब्ध करून आणला असल्याची माहिती माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी दिली. कोकेश्वरी मंगल कार्यालय कोकरसा ता.मंठा जि.जालना येथे दिनांक २१ ऑक्टोबर २०२४ सोमवारी भारतीय जनता पार्टी तर्फे आयोजित तळणी व जयपूर या दोन जिल्हा परिषद सर्कल मधील कार्यकर्त्यांच्या बैठकीत मार्गदर्शन करताना ते बोलत होते. पुढे बोलताना माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की मुख्यमंत्री लडकी बहीण योजना, दिव्यांग बांधवांच्या योजना, मुख्यमंत्री लाडकी लेक योजना, सावित्रीबाई फुले स्वातंत्र्य स्वयं योजना, अनाथ बालकांच्या योजना आशा केंद्र व राज्य सरकारच्या माध्यम ातून राज्यभरात राबविलेल्या शेकडो योजनांचा लाभ तळागाळातील सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचविण्याकरिता आपण परतूर मंठा जालना या तहसील कार्यालया सह जिल्हा अधिकारी जालना यांच्या



दालनात आढावा बैठक घेऊन परतुर मंठा वनेर सेवली सर्कल मध्ये भव्य जनजागृती मेळावा व कॅम्पचे आयोजन केले होते यातून मतदारसंघातील लाखो लाभार्थ्यांना याचा लाभ मिळाला असून. म ोदी आवास योजना शबरी आवास योजना रमाई आवास योजना यशवंतराव चव्हाण आवास योजना पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर आवास योजना या विविध योजनेच्या माध्यमातून परतुर विधानसभा मतदारसंघातील पंचवीस हजार लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्यात आला असल्याची माहिती यावेळी आमदार बबनराव लोणीकर यांनी आवर्जून दिली. या प्रसंगी भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर, गणेशराव खवने सतीश निरवळ संदीप गोरे नाथाभाऊ काकडे नारायण काकडे विठ्ठलमामा काळे राजेश मोरे सुरेशबापू बाहेकर विलास घोडके विवेक काकडे गजानन देशमुख मनोज देशम ुख तारासिंग चव्हाण नितीन सरकटे शरद पाटील रामेश्वर देशमुख भगवान देशमुख राम किशन बोडखे नवनाथ खंदारे नवनाथ चट्टे आबासाहेब सरकटे दारासिंग चव्हाण सुभाष लाड शिवशंकर डोईफोडे बाजीराव आघाव प्रकाश गबाळे अजय जाधव भागवत देशमुख सचिन राठोड केशव येऊल दत्तराव कांगणे दिपक दवणे अशोक राठोड किशोर हनवते राहुल बाहेकर कैलास चव्हाण शंकर बांडगे गजानन शिंदे अरुण खवणे नारायण काकडे सुभाष चव्हाण जगन टकले संजय टकले नितीन चाटे आत्म ाराम राठोड भास्कर जाधव सिद्धेश्वर सरकटे गणेश दवणे सुंदरराव दवणे निवास देशमुख यांच्या सह हजारो भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

# मंठ्यातील लिंबखेडा शिवारातील जुगार अड्ड्यावर छापा

## पाच लाखांचा मुद्देमाल जप्त; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई



**जालना । प्रतिनिधी** - जिल्ह्यातील मंठा तालुक्यात असलेल्या लिंबखेडा शिवारात जुगार अड्ड्यावर छापा टाकत पाच लाख २२ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलीसांनी जप्त केला आहे. यात अकरा जणांविरोधात कारवाई करण्यात आली आहे. ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केली.

याबाबत अधिक माहिती अशी की, पोलीस अधिक्षक यांनी दिलेल्या सुचना व आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली रविवार (दि २०) रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने मंठा पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध धंद्यांची माहिती घेत असतांना त्यांना मौजे लिंबखेडा शिवारात जुगार अड्डा सुरु असल्याचे माहिती गोपनीय बातमीदारामार्फत मिळाली होती. या माहितीवरून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने लिंबखेडा शिवारात रविवार (दि २०) रोजी दुपारी साडेतीन वाजेच्या सुमारास छापा म ारून कारवाई केली या कारवाईत रामदास भास्कर गायकवाड, वय ४० वर्ष, रा.येवती ता.लोणार जि. बुलडाणा, प्रल्हाद शामराव नागरे, वय ४० वर्ष, रा.येवती ता. लोणार जि. बुलडाणा, समाधान ज्ञानदेव आघाव, वय ४३ वर्ष, रा. अंभोरा शेळके, ता. मंठा जि. जालना, राजु रामदास कायंदे, वय ३५ वर्ष, रा. येवती ता. लोणार जि. बुलडाणा, सोपान साहेबराव गायकवाड, वय ४० वर्ष, रा. टाकळखोपा ता. मंठा जि. जालना यांच्यासह जुगार अड्डा चालविणारे गजानन राठोड रा. लिंबखेडा ता. मंठा जि. जालना, संतोष म्हस्के रा. लिंबखेडा ता. मंठा जि. जालना तसेच घटनास्थळावरुन वाहनासह पळुन गेलेले ०४ जुगारी असे एकुण अकरा इसमांविरुध्द पोलीस ठाणे मंठा येथे म हाराष्ट्र जुगार कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईत रोख रक्कम, मोबाईल, मोटारसायकल असा एकूण ५ लाख २२ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.